महाराष्ट्र शासनाचा २०१२-१३ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# श्री. अजित पवार

## उपमुख्यमंत्री (वित्त)

यांनी
सोमवार, दिनांक २६ मार्च २०१२ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

*

अध्यक्ष महोदय,

मी आता अर्थसंकल्पाचा भाग-२ सभागृहापुढे सादर करीत आहे.

कर संकलनाचा आढावा.

१. आर्थिक आघाडीवर या वर्षाची सुरुवात आशादायक होती. तथापि, विविध कारणांमुळे अर्थव्यवस्थेचा विकास दर अपेक्षित पातळी गाठू शकला नाही. या पार्श्वभूमीवर मला सांगण्यास आनंद होतो की विक्रीकर विभागाच्या कर संकलनात मागील वर्षीच्या तुलनेत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. चालू वर्षाच्या ४७,९७५ कोटी रुपयांच्या विक्रीकर विभागाच्या उद्दिष्टापेक्षा ४००० कोटी रुपये अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे. मुद्रांक शुल्क संकलनात अपेक्षित वाढ होऊ शकली नाही. तथापि, एकूण महसूल संकलनाचे उद्दिष्ट गाठले जाईल असा माझा विश्वास आहे.

विक्रीकर विभागाचे संगणकीकरण.

२. विक्रीकर विभागाच्या संगणकीकरणामुळे व्यापाऱ्यांना चांगल्या सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. तसेच महसूल वाढीच्या दृष्टीनेही चांगले परिणाम दिसू लागले आहेत. संगणकीकरणाच्या पुढील टप्प्यावर महाराष्ट्रात अवलंबिण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या पायलट प्रोजेक्टद्वारे विविध विभागात असलेली आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती संकलित करण्यात येत आहे. माहितीच्या विश्लेषणाकरिता ‘ बिझनेस इंटेलिजेंस ’ व ‘ डाटा वेअर हाऊस ’ प्रकल्प सुरु केले आहेत. याकरिता विभागाने ‘ आर्थिक बुद्धीसंपदा ’ विभाग नव्याने स्थापित केला आहे. व्यापाऱ्याच्या खरेदीवर त्याच्या विक्रेत्यानी भरलेल्या कराची माहिती व्यापाऱ्याला ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रणाली विकसित करण्याचे काम सुरु केले आहे. यामुळे कर प्रणाली अधिक पारदर्शी होऊन कर चुकवेगिरीसही आळा बसेल.

लवकरच व्यापाऱ्यांचा परतावा ‘ ईसीएस ’ द्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची सुविधा देण्यात येईल व केंद्रीय विक्रीकर कायद्याखालील ‘ क ’ इत्यादी नमूने इलेक्ट्रॉनिक स्वरुपात देण्यात येतील.

वस्तू व सेवाकरासाठी संगणक प्रणाली.

३. १ ऑगस्ट, २०१२ पासून वस्तू व सेवा कराची संगणक प्रणाली (GSTN) सुरु करण्याचे केंद्रीय अर्थसंकल्पात घोषित करण्यात आले आहे. याच्या उभारणीमध्ये महाराष्ट्राचा सक्रीय सहभाग आहे.

उशिरा विवरणपत्र भरण्यासाठी विलंब शुल्काची तरतूद तसेच उशिरा नोंदणी घेणाऱ्यासाठी शास्ती.

४. विक्रीकराचा महसूल मुख्यत: विवरणपत्राद्वारे गोळा होतो. प्रभावी कर संकलनाच्यादृष्टीने विवरण उशिरा भरणाऱ्यास रुपये ५०००/- च्या दंडा ऐवजी रुपये ५०००/- एवढा विलंब शुल्क भरल्याशिवाय विवरण दाखल करता न येण्याची तरतूद करण्यात येत आहे. तसेच विहित मुदतीत नोंदणी दाखला न घेणाऱ्यांसाठी दंडाची तरतूदही करण्यात येत आहे.

अपिल लवकर निकाली काढण्याकरिता उपाययोजना व अनावश्यक अपिल टाळण्याकरिता तरतूद.

५. विक्रीकराचा मोठा महसूल अपिल प्रकरणात अडकून आहे. अपिले लांबविण्यात येऊ नयेत व लवकर निकाली निघावीत याकरिता उपाययोजना करण्यात येत आहे. अपिलकर्त्याने तीन तारखा घेतल्यास किंवा तीन वेळा गैरहजर राहिल्यास पुढे स्थगिती कायम ठेवण्याकरिता विवादित रक्कमेपैकी किमान १५ टक्के अथवा रुपये १५ कोटी यापैकी जी कमी असेल एवढी रक्कम भरावी लागेल. तसेच शासनाकडून उच्च न्यायालयात जाणारी अपिले कमी करण्याच्यादृष्टीने आयकर अधिनियमाच्या कलम २६८-अ सदृश तरतूद करण्यात येत आहे.

मूल्यवर्धित कर कायद्यात विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेसंबंधी व इतर तांत्रिक बदल.

६. विक्रीकर विभागाची जानेवारी २०१२ पासून पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेच्या अनुषंगाने मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम १० मध्ये बदल करण्यात येत आहे. याचप्रमाणे विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या इतर कायद्यांमध्येही यासदृश तरतूदींमध्ये बदल करण्यात येत आहे.

विवादित प्रश्नाचा निर्णय भावी प्रभावाने लागू करण्यासाठीचा अर्ज निर्णय दिल्यानंतर, तीन वर्षाचे आत करता येईल. मूल्यवर्धित कर कायद्यामध्ये निर्धारणा करण्यासाठीचा कालावधी वाढविण्यात आला आहे. त्याअनुषंगाने व्यवसायाची लेखापुस्तके जतन करण्यासाठीचा कालावधी पूर्वलक्षी प्रभावाने आठ वर्षे करण्यात येत आहे. याशिवाय मूल्यवर्धित कर कायद्यामध्ये काही तांत्रिक स्वरुपाचे बदल जसे मोटार स्पिरीट व पेट्रोलियम पदार्थ पूर्वलक्षी प्रभावाने परिभाषित करणे, कलम ८ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्रातील सहविकासकाचा समावेश व विकासकाच्या व्याख्येत बदल प्रस्तावित आहे.

व्यवसाय कर. ७. व्यवसाय कर कायद्याखाली नवीन नाव नोंदणी घेणाऱ्याचे कर दायित्व नाव नोंदणीच्या वर्षापासून आठ वर्षे पर्यंतच मागे नेता येईल. व्यवसाय करात सुधारित विवरणपत्र भरण्याची तरतूद करण्यात येत आहे. तसेच उशिरा विवरणपत्र दाखल करणाऱ्यास रुपये ३००/- दंडाऐवजी रुपये १०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल. कलम १९ मध्ये काही तांत्रिक सुधारणा प्रस्तावित आहेत.

उस खरेदी कर. ८. शासनाने सहविज निर्मिती प्रकल्प उभारणाऱ्या साखर कारखान्यांसाठी उस खरेदी करातून सूट देण्याची योजना जाहीर केली आहे. या अनुषंगाने उस खरेदी कर कायद्याच्या कलम १२ बी मध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

कर विषयक प्रस्ताव. अध्यक्ष महोदय, मी आता काही करविषयक प्रस्ताव सदनासमोर सादर करीत आहे.

फर्निशिंग कापडावर कर व कापड प्रक्रिया उद्योगाला करमाफी. ९. मागील वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात कापडावरील अतिरिक्त अबकारी कर काढण्यात आला. त्याला अनुसरुन काही राज्यांनी मागील वर्षी कापडावर व्हॅट आकारला तरी महाराष्ट्रात हा करमुक्त ठेवण्यात आला होता. परंतु यावर्षी फक्त आच्छादनाच्या ( फर्निशिंग ) कापडाच्या विक्रीच्या अंतिम टप्प्यावर ५ टक्के कर आकारण्याचे प्रस्तावित आहे.

कापड प्रक्रिया उद्योग राज्यात मोठ्या प्रमाणात आहे. मागील वर्षी केंद्रीय अतिरिक्त अबकारी करात बदल झाल्यामुळे राज्यातील कापड प्रक्रिया उद्योगावर कर लागू झाला. मात्र कापड प्रक्रिया उद्योगाला कापड प्रक्रियावरील करातून सूट देण्याचे घोषित करीत आहे.

बिडी. १०. राज्यात तंबाखूजन्य पदार्थावर २० टक्के कर आकारण्यात येतो. यातून बिडी व अनुत्पादित तंबाखूला वगळण्यात आले होते. बिडी ही आरोग्याला तेवढीच घातक आहे. अनेक राज्यांमध्ये बिडीवर कर आकारण्यात येतो. बिडीवर मी १२.५ टक्के कर आकारण्याचे प्रस्तावित करीत आहे.

छोट्या पुड्यांमध्ये ब्रँड नावाखाली विकण्यात येणारा तंबाखू हा अनुत्पादित तंबाखू होत नाही. परंतु अनेक तंबाखू उत्पादक याची विक्री अनुत्पादित तंबाखू म्हणून करतात व यावर कर चुकवतात. याकरिता सदर नोंद स्पष्ट करण्यात येत आहे.

घरगुती एलपीजी गॅस.

११. वर्ष २००८ मध्ये राज्याने घरगुती वापरासाठी एलपीजी करमुक्त केला होता. मागील वर्षीही सूट कायम ठेवली होती. अनेक राज्यांमध्ये घरगुती वापराच्या एलपीजीवर कर आहे. राज्यात घरगुती वापराच्या केरोसिनवर सुद्धा कर आकारण्यात येतो. तरी घरगुती वापराच्या गॅसवर मी ५ टक्के कर प्रस्तावित करीत आहे.

प्लास्टर ऑफ पॅरीस.

१२. प्लास्टर ऑफ पॅरीस हे आंतरिक सुशोभिकरण करण्यासाठी वापरण्यात येते. यावरील कराचा दर ५ टक्केवरुन १२.५ करण्याचे प्रस्तावित आहे.

सुका मेव्यावरील कराचे सुसूत्रीकरण.

१३. मनुका व बेदाणे यांना ३१ मे, २०१२ पर्यत करातून सूट देण्यात आली होती. काजूवर कराचा दर १२.५ टक्के तर इतर सुक्या मेव्यावर कराचा दर ५ टक्के असा आहे. सुक्या मेव्यावरील कराचे वेगवेगळे दर हे व्यापाऱ्यांच्या दृष्टीने अडचणीचे आहेत. तरी १ एप्रिल, २०१२ पासून सर्व सुक्या मेव्यावरील कराचा दर हा ५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यात उत्पादित काजूकरिता औद्योगिक विकास अनुदानाची योजना यापुढेही चालू राहील व ही योजना राज्यात उत्पादित मनुका व बेदाणे याकरिता लागू करण्यात येईल.

विमान इंधनावरील कर.

१४. विमान इंधनावर राज्यात सर्वसाधारण कर २५ टक्के आहे. परंतु राज्यात इतर ठिकाणी विमान वाहतुकीस प्रोत्साहन म्हणून पुणे व मुंबई व्यतिरिक्त कराचा दर ४ टक्के ठेवण्यात आला होता. आधारभूत कराचा दर हा ५ टक्के करण्यात आल्यामुळे मुंबई व पुणे व्यतिरिक्त विमान इंधनावरील कराचा दर १ एप्रिल २०१२ पासून ५ टक्के करण्यात येत आहे.

राज्याबाहेर शाखांना पाठविलेल्या मालाच्या वजावटीत कपात.

१५. केंद्राने आंतरराज्यीय विक्रीवर केंद्रीय विक्रीकराचा दर ४ टक्के वरुन २ टक्के केल्यामुळे राज्याच्या महसूलावर परिणाम झाला आहे. यावर उपाय योजना म्हणून विक्रीशिवाय राज्याबाहेर शाखांना पाठविण्यात येणाऱ्या मालासंबंधी वजावटीत कपात १ एप्रिल, २०१२ पासून सध्याच्या २ टक्केवरुन ४ टक्के करण्यात येत आहे.

वाळू व इतर काही वस्तूंवरील स्त्रोतात कर संकलन.

१६. वाळूच्या विक्रीवर मोठ्या प्रमाणात करचुकवेगिरीस वाव आहे. याकरिता वाळूची लिलावाद्वारे होणाऱ्या विक्रीच्या वेळीच काही प्रमाणात कराची वसूली व्हावी व पुढे लिलावधारकांचा पाठपुरावा करता यावा या दृष्टीने लिलाव रक्कमेव्यतिरिक्त काही प्रमाणात करापोटी रक्कम वसूल करण्याची तरतूद करण्यात येत आहे. तसेच इतर काही वस्तूंमध्ये कराचे प्रभावी संकलन होण्याकरिता अधिसूचीत वस्तूंवर अधिसूचित एजन्सीद्वारे वस्तूंची डिलिव्हरी देताना काही प्रमाणात करापोटी रक्कम वसूल करता यावी यासाठी तरतूद करण्यात येत आहे. असा संकलित केलेला कर संबंधित व्यापाऱ्यांच्या अंतिम करदायित्वाशी समायोजित केला जाईल.

**कापूस व तेलबियांवर खरेदीकर.**

१७. कापूस व तेलबियांच्या विक्रीवर ५ टक्के मूल्यवर्धित कर आहे. तथापि, मूल्यवर्धित कर कायद्यात खरेदी कराची तरतूद नाही. त्यामुळे नोंदित व्यापाऱ्यांकडून व अनोंदित व्यक्तींकडून खरेदी केलेल्या व राज्याबाहेर पाठविलेल्या मालाच्या करदायित्वामध्ये समानता रहात नाही. ही तफावत विशेषत: कापूस व तेलबियांच्या उद्योगात आढळून आली आहे. ही असमानता दूर करण्यासाठी कापूस व तेलबियांच्या अनोंदित व्यक्तींकडून केलेल्या खरेदीवर खरेदीकर आकारण्याचे प्रस्तावित आहे. खरेदीकर मूल्यवर्धित कराएवढाच असेल व त्याची नियमानुसार वजावट उपलब्ध असेल. खरेदीकर संबंधी मूल्यवर्धित कर कायद्याच्या इतर तरतूदींमध्ये अनुषंगिक बदल करण्यात येतील.

**नैसर्गिक वायूवर प्रवेशकर.**

१८. नैसर्गिक वायूच्या स्थानिक विक्रीवर १२.५० टक्के कर आकारणी केली जाते. नैसर्गिक वायू मोठ्या प्रमाणावर राज्याबाहेरुन येवू लागला आहे. नैसर्गिक वायूवर १२.५० टक्के दराने प्रवेश कर आकारण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. नैसर्गिक वायूची फेरविक्री केल्यास पूर्ण वजावट उपलब्ध असेल अन्यथा नैसर्गिक वायूवर भरलेल्या प्रवेश कराची अथवा मूल्यवर्धित कराची ३ टक्के कपात करुन वजावट नियमाप्रमाणे मिळेल.

तसेच मोटारवाहन प्रवेशकर व वस्तूवरील प्रवेश कर अधिनियमात ई-पेमेंट, ई-रिटर्न व काही तांत्रिक सुधारणा पूर्वलक्षी प्रभावाने करण्याचे प्रस्तावित आहे. वस्तुवरील प्रवेश कर अधिनियमांतर्गत प्रवेश कराचे दर मूल्यवर्धित कर कायद्याप्रमाणे असतील.

**अनोंदित कंत्राटदाराकडून खरेदीवर कपात.**

१९. अनोंदित कंत्राटदाराकडून केलेल्या कार्यकंत्राटात देय रक्कमेतून ४ टक्के करापोटी कपात करण्याची तरतूद आहे. सर्वसाधारण आपसमेळ कर हा ५ टक्के असल्यामुळे कपातीचा दर ५ टक्के करण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेच्या अभि-हस्तांतरणावर आकारल्या जाणाऱ्या मुद्रांक शुल्काची रचना सुटसुटीत करणे व त्यात सुधारणा.**

२०. स्थावर मालमत्तेच्या अभिहस्तांतरण दस्तऐवजांसाठी क्षेत्रनिहाय विविध दराने मुद्रांक शुल्क आकारणी न करता प्रचलित दरामध्ये सुधारणा करुन सुटसुटीत अशी मुद्रांक शुल्क आकारणीची रचना करण्याच्यादृष्टीने ग्रामपंचायत, नगर परिषद व प्रभाव क्षेत्र आणि महानगरपालिकांसह इतर नागरी क्षेत्रासाठी अनुक्रमे ३ टक्के, ४ टक्के व ५ टक्के दराने मुद्रांक शुल्क दर आकारण्यासाठी अधिनियमात सुधारणा करणे प्रस्तावित आहे.

कार व जीप या वाहनांवरील मोटार वाहन करात वाढ करणे.

२१. कार व जीप्स् या वाहनांवर वाहनाच्या किंमतीनुसार मोटार वाहन कर आकारला जातो. रुपये १० लाखापर्यंतच्या वाहनावर ७ टक्के, रुपये १० ते २० लाखापर्यंतच्या वाहनांवर ८ टक्के व रुपये २० लाखावरील वाहनांवर ९ टक्के कर आकारला जातो. पेट्रोलवर चालणाऱ्या कार व जीप्सवरील करात २ टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच डिझेल वर चालणाऱ्या कार व जीप्स वरील करात ४ टक्के वाढ प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, आता मी माझे करसवलतीचे प्रस्ताव मांडतो.

जीवनावश्यक वस्तू.

२२. राज्यात काही जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिर्ची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापूरी चादर व टॉवेल यावर ३१ मार्च २०१२ पर्यंत सूट देण्यात आली आहे. सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समितीने यावर ५ टक्के कराची शिफारस केली आहे. तथापि, या जीवनावश्यक वस्तू असल्यामुळे यावरील सूट यापुढेही ३१ मार्च,२०१३ पर्यंत चालू ठेवण्याचे मी घोषित करीत आहे.

चहावरील ५ टक्के सवलतीच्या दरालाही ३१ मार्च २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सूतावरील कर कमी करणे.

२३. राज्यात मोठ्या प्रमाणात हातमाग व यंत्रमाग उद्योग आहेत. राज्यातील व आंतरराज्यातील कराच्या दरातील फरकामुळे मोठ्या प्रमाणात सूताची परराज्यातून खरेदी होते व राज्याच्या महसूलावर परिणाम होतो. याकरिता सूतावरील कराचा दर ५ टक्क्यावरुन २ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

शैक्षणिक साहित्य व लिफाफे.

२४. लिखाणासाठी वापरण्यात येणारे बोर्ड अथवा पॅड, परीक्षेसाठी वापरण्यात येणारे पॅड, पांढरे, काळे व हिरवे फळे, ड्राईंग बोर्ड, ड्राईंग चारकोल, खोड रबर, फूटपट्टी, स्टेपलर, चमकी पेन ( ग्लिटर पेन ), स्केचपेन, पेन्सिलिचे शिसे, रंगाच्या कांड्या किंवा टयूब ( ऑईल पेस्टेल ), तसेच लिफाफे यावर कराचा दर १२.५ टक्के वरुन ५ टक्के करण्यात येत आहे.

कुक्कुटपालन उद्योगासाठी यंत्रसामुग्री.

२५. राज्यात कुक्कुटपालन उद्योगासाठी यंत्रसामुग्रीवर १२.५ टक्के कर आहे. कुक्कुटपालन उद्योगास प्रोत्साहन देण्यासाठी या यंत्रसामुग्रीवर कराचा दर ५ टक्के करण्यात येत आहे.

तेल घाणी.

२६. तेल घाणी हा पारंपारिक ग्रामीण उद्योग आहे. खादी ग्रामोद्योग प्रमाणित तेल घाणीतून उत्पादित होणाऱ्या तेल व पेंड याला रुपये २० लाखाच्या वार्षिक उलाढालीपर्यंत सूट देण्यात येत आहे.

पोषक आहार. २७. एकात्मिक बालविकास योजनेखाली आंगणवाडीला पुरवठा करण्यात येणाऱ्या ' पूरक पोषक आहाराला ' करातून संपूर्ण सूट देण्यात येत आहे.

अंशतः प्रक्रिया केलेले मिश्रण व शिजवण्यासाठी तयार सील्ड कंटेनरमधील पदार्थ. २८. सील्ड कंटेनरमधील अथवा फ्रोजन मांस व फळे (कच्चे अथवा अंशत: प्रक्रिया केलेले ) हे सध्या ५ टक्क्यास करपात्र आहेत. परंतु शिजवण्यासाठी तयार सिल्ड कंटेनरमधील शाकाहारी पदार्थ मात्र १२.५ टक्के करास पात्र आहेत. तरी याचा समावेश ५ टक्केमध्ये करण्यात येत आहे.

काही वस्तूंवर कर कपात. २९. ॲडल्ट डायपर, सॅनिटरी नॅपकिन्स, रेनकोट, सुरक्षेचे हेल्मेट, रिबीन, बो, काजळ, बांबूपासून तयार होणाऱ्या वस्तू, खनिज मीठ ( रॉक सॉल्ट ) या वस्तूवरील कराचा दर १२.५ टक्क्यावरुन ५ टक्के करण्यात येत आहे.

सी.एन.जी.वरील वाहनांच्या करामध्ये २ टक्के सूट. ३०. उत्पादकाकडून सीएनजी किट बसविलेल्या नवीन कार व जीप्सच्या खरेदीवर आकारण्यात येणाऱ्या मोटार वाहन करात २ टक्के सूट प्रस्तावित आहे. नवीन कराचे दर रुपये १० लाखापर्यंतच्या वाहनावर ५ टक्के, १० ते २० लाखापर्यंतच्या वाहनावर ६ टक्के व रुपये २० लाखाच्या वरील वाहनावर ७ टक्के असे असतील.

बॅटरी वरील वाहनांना कर सवलत. ३१. राज्यात खरेदी होणाऱ्या व नोंदणी होणाऱ्या बॅटरी ऑपरेटेड वाहनांसाठी प्रचलित मोटार वाहन करामध्ये १०० टक्के सवलत देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रलंबित विद्युत शुल्कासाठी अभययोजना. ३२. विद्युत शुल्कापोटी राज्य शासनाची जुनी थकबाकी मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे. यापैकी बऱ्याच थकबाकीबाबत न्यायालयात वाद चालू आहेत. हे वाद संपावेत व शासकीय महसूलाची सत्वर वसूली व्हावी म्हणून मी एक अभय योजना जाहीर करत आहे. या योजनेंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत प्रलंबित असेलेल्या विद्युत शुल्काचा विद्युत शुल्क थकबाकीदारांनी एक रक्कमी भरणा केला तर, त्यापोटी देय असणाऱ्या व्याजात त्यांना ५० टक्के सूट देण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०१२ ते ३० जून ,२०१२ असा असेल व संबंधितांनी या योजनेंतर्गत अर्ज सादर करताना न्यायालयातील प्रलंबित प्रकरण मागे घेणे आवश्यक असेल.

अध्यक्ष महोदय, या करप्रस्तावात राज्याच्या विविध विकास योजनांना लागणाऱ्या अतिरिक्त महसूलाची गरज लक्षात घेऊन करवाढ कमीत कमी ठेवून संतुलन राखण्याचा प्रयत्न केला आहे. या कर प्रस्तावांद्वारे अंदाजे ६०० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल प्राप्त होईल. या प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल असा माझा विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!